PMS Letter 2019/1

# सातारा जिल्हा परिषद
## सामान्य प्रशासन विभाग

दूरध्वनी क्रमांक : (02162) 238126 E-mail : dyceogadstr@gmail.com

**कालमर्यादा-०५/१२/२०१९**

जाक्र.साप्रवि/आयटीसेल/PMS/३०४/२०१९
दिनांक- ३० / ११ / २०१९

प्रति,

१) **कार्यकारी अभियंता,**
**बांधकाम विभाग (दक्षिण/उत्तर), जि.प.सातारा**

२) **कार्यकारी अभियंता,**
**ग्रामीण पाणी पुरवठा, जि.प.सातारा**

३) **कार्यकारी अभियंता,**
**लघुपाट बंधारे विभाग, जि.प.सातारा.**

**विषय- जिल्हा परिषद सातारा अंतर्गत प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम (PMS) प्रणालीच्या अंम्मलबजावणीबाबत..**

संदर्भ- १) ग्राम विकास विभागाकडील शानिक्र.आयटी-२०१७/प्रक्र.४२(भाग-३) मातंक दिनांक-०६/०७/२०१९
२) ग्राम विकास विभागाकडील शानिक्र.आयटी-२०१७/प्रक्र.४२(भाग-३) मातंक दिनांक-०६/११/२०१९

उपरोक्त विषयसंदर्भान्वये कळविण्यात येते की, जिल्हा परिषदे मध्ये बांधकाम विषयक कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टिम (PMS) ही प्रणाली सीडॅक या केंद्रशासनाच्या संस्थेकडून आपणांस पुरविण्यात आली आहे. या PMS प्रणाली अंतर्गत जिल्हा परिषदेतील बांधकाम विभाग (उत्तर/दक्षिण), लघुपाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सीडॅक मार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना युझर आयडी व पासवर्ड देण्यात आलेले आहेत. त्यानुसार शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे प्रत्येक विभागाने प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये Pilot स्तरावर एक काम निवडून ते यशस्वीरित्या पूर्ण करावे व त्यानंतर सर्व कामे सदर प्रणालीमध्ये भरण्याबाबत सूचित केले आहे.

तसेच जिल्हा परिषद अंतर्गत आपल्या कार्यालयातील उपरोक्त संवर्गातील तंत्रस्नेही अधिकारी/कर्मचारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी व त्यांना प्रवीण प्रशिक्षकाचा दर्जा देण्याचा आहे. त्यानुसार आपल्या विभागाकडे PMS प्रणालीसाठी नोडल अधिकारी कोणाची नियुक्ती केली आहे, त्यांचे नाव, हुद्दा, मोबाईल नंबर इ.माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

Scanned by CamScanner

तरी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांनी आपल्या विभागामार्फत प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत पूर्ण झालेल्या कामाचा अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले आहे. जिल्हा परिषदेकडील PMS प्रणाली अंतर्गत होणाऱ्या कामाचा अहवाल शासनांस वेळोवेळी (दरमहा) सादर करण्याचा आहे.

याबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास सीडॅक यांचेशी तात्काळ संपर्क साधावा व कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच PMS संदर्भात काही तांत्रिक अडचणी असतील तर जिल्हा परिषद साताराकडील श्री.नटराज पाटील / श्री.रोहित पवार, DPL, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, तिसरा मजला,जि.प.सातारा यांचेशी संपर्क साधावा. PMS प्रणाली अंतर्गत केलेल्या कामाचा अहवाल **दिनांक-०५/१२/२०१९** पर्यंत सादर करावा.

(मनोज जाधव)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रत- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- मा.अतिमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत- श्री.नटराज पाटील/श्री.रोहित पवार, DPL, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, जि.प.सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner